॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३२४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


✻ सुविचार ✻

जो माणूस स्वतःला सुखी समजत नाही तो कधीच सुखी नसतो.

# अमेरिका - इराण मधील युद्ध थांबले

## २ आठवडे सशर्त युद्धविराम । इराण, अमेरिकेची सहमती

● **वॉशिंग्टन -** इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्ध तब्बल ४० दिवसांनंतर आज थांबले. दोन्ही देशांमध्ये शस्त्रसंधी झाली असून, दोन्ही देशांनी २ आठवड्यांसाठी सैन्य कारवाया थांबविण्याचा निर्णय घेतला. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा केल्यानंतर इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनीही एक्सवर पोस्ट करून वृत्ताला दुजोरा दिला. इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेच्या वतीने निवेदन जारी करत अराघची यांनी २ आठवड्यांसाठी शस्त्रसंधी करण्यात आल्याचे मान्य केले. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध थांबवण्यात चीन आणि पाकिस्तानने मध्यस्थी केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

इराणने दिलेला १० अटींचा मसुदा मान्य करण्यासारखा असल्याचे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले तर होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याची अट अमेरिकेने घातली होती. या अटीला इराणनेही सकारात्मक प्रतिसाद दिला. इराण होर्मुझ पूर्णपणे आणि लगेच खुले करायला तयार झाल्याचे ट्रम्प यांनी सांगितले. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध थांबवण्यात चीन आणि पाकिस्तानने मध्यस्थी केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दरम्यान, इराणने पाकिस्तानमार्फत अमेरिकेकडे एक सविस्तर प्रस्ताव पाठवला, जो आता अमेरिकन बाजू वाटाघाटीसाठी पुढे करणार आहेत. सध्या अमेरिका आणि इराण यांच्यात २ आठवड्यांसाठी शस्त्रसंधी झाली असून १० एप्रिल रोजी पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये इराण आणि अमेरिका यांच्यात चर्चा सुरू होईल.

ट्रम्प म्हणाले की, मी दोन आठवड्यांच्या कालावधीसाठी इराणवरील बॉम्बहल्ले आणि हल्ले थांबवण्यास सहमत आहे. हा द्विपक्षीय युद्धविराम असेल. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि फील्ड मार्शल आसिम मुनीर यांच्याशी झालेल्या माझ्या चर्चेनुसार आणि त्यांच्या विनंतीनुसार मी आज रात्री इराणकडे पाठवण्यात येणारी विनाशकारी लष्करी शक्ती थांबवत आहे. परंतु इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे



उघडण्यास सहमती दर्शवावी, अशी माझी अट आहे. मला इराणकडून १० कलमी प्रस्ताव मिळाला. वाटाघाटींसाठी हा एक व्यवहार्य आधार आहे, असेही ट्रम्प म्हणाले.

अमेरिका-इराणची तात्पुरती युद्धबंदी पश्चिम आशियात राजकारणाला कलाटणी देणारी ठरली. इराणकडून १० अटी घालण्यात आल्यानंतर त्या चर्चायोग्य असल्याचे सांगत २ आठवड्यांची शस्त्रसंधी केली. या निर्णयामुळे युद्धखोर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांची मोठी राजकीय आणि लष्करी कोंडी झाली. निष्पाप लोकांची गाझापट्टी साफ केल्यानंतर लेबनॉनमध्येही तेच करत सुटलेल्या नेतेन्याहू यांचे करायचे काय, असा प्रश्न सतावण्याची शक्यता आहे.

### इराणच्या १० अटी

- अहिंसेप्रती कटिबद्धता
- होर्मुझ सामुद्रधुनीवर इराणचे नियंत्रण कायम
- युरेनियम संवर्धनास परवानगी
- सर्व प्राथमिक निर्बंधांची समाप्ती
- सर्व दुय्यम निर्बंधांची समाप्ती
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सर्व ठरावांचा अवलंब थांबवणे
- गव्हर्नर्स बोर्डाच्या सर्व ठरावांचा अवलंब थांबवणे
- इराणला नुकसानभरपाई देणे
- पश्चिम आशियातील अमेरिकेच्या सैन्याची माघार
- लेबनॉनमधील हिझबुल्लाहविरुद्ध युद्धासह सर्व संघर्षांवर युद्धविराम

## SPOT NEWS

### युद्धविरामानंतर सोन्याच्या दरात ३००० रुपयांनी वाढ

● **जळगाव -** इराण-अमेरिका यांच्यामध्ये गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या युद्धाला अखेर युद्धविराम मिळाला आहे. युद्धविरामाची घोषणा केल्यानंतर जागतिक बाजारात मोठ्या घडामोडी घडण्यास सुरुवात झाली आहे. कच्च्या तेलाच्या दरात मोठी घसरण झाली आहे त्यामुळे पेट्रोल-डिझेलच्या दरात घसरण होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे सोने-चांदीच्या दरामध्ये वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. जळगावच्या सुवर्णनगरीत सोने-चांदीच्या दरात मोठा बदल झाला आहे. सोने-चांदीच्या दरात आज मोठी वाढ झाल्यामुळे ग्राहकांमध्ये नाराजी पाहायला मिळत आहे. जळगावच्या सुवर्णनगरीमध्ये २४ कॅरेटच्या १ तोळा सोन्याच्या दरामध्ये तब्बल ३००० रुपयांनी वाढ झाली आहे. तर १ किलो चांदीच्या दरामध्ये १०००० रुपयांनी वाढ झाली आहे. आज २४ कॅरेट सोन्याचा दर जीएसटीसह १ लाख ५६ हजार ४५ रुपयांवर पोहोचला आहे. तर चांदीचे दर जीएसटीसह २ लाख ५४ हजार ४१० रुपयांवर गेला आहे. सोनं आणि चांदीच्या दरात आणखी वाढ होण्याचा अंदाज सुवर्ण व्यावसायिकांनी व्यक्त केला आहे.

### लालपरीच्या तिकीट दरात १० टक्के वाढ

● **मुंबई -** एसटीने सुट्टीत प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांसाठी खिशाला चाट देणारी बातमी दिली आहे. एसटी महामंडळाने उन्हाळ्याच्या सुट्ट्या लक्षात घेता आणि त्यामुळे होणारी गर्दी लक्षात घेता भाडेवाढ केली आहे. माहितीनुसार, साध्या बसेसच्या दरामध्ये दहा टक्के वाढ करण्यात आली आहे. १५ एप्रिल ते १५ जून या काळासाठी ही वाढ करण्यात आली आहे. फक्त साध्या बसेसला ही दरवाढ लागू होणार असून एसी किंवा शिवशाही, शिवनेरी तसंच शिवाई बसेसला ही दरवाढ लागू होणार नाही. राज्य परिवहन मंडळाने एसटी महामंडळाला विशिष्ट कालावधीत भाडेवाढ करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार एसटी महामंडळाने उन्हाळी गर्दीच्या हंगामामध्ये साध्या बससेवा प्रवास भाडे दरात दरवाढ केलीय. दहा टक्के इतकी दरवाढ करण्यात आली आहे.

## राज्यात शनिवारपासून 'पटपडताळणी'

● **मुंबई । वीरभूमी -** राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांची अचूक नोंद आणि उपस्थितीची खात्री करण्यासाठी शिक्षण विभागाने 'पटपडताळणी' मोहिमेला वेग दिला असून ११, १५ आणि २२ एप्रिल २०२६ या तीन टप्प्यांत ही प्रक्रिया राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे बनावट विद्यार्थी व शाळा शोधण्यासाठी शिक्षण संचालनालयाने पुन्हा एकदा निर्णय घेतला असून यामध्ये इयत्ता दुसरी ते नववी आणि अकरावीच्या वर्गांचा समावेश करण्यात आला आहे.

३१ मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेल्या आदेशानुसार, राज्यातील शाळांमध्ये विविध इयत्तांतील विद्यार्थ्यांची पटपडताळणी विशिष्ट तारखांना करणे बंधनकारक करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, ही पडताळणी परीक्षा काळातच करण्याचे नियोजन असल्याने शिक्षकांची मोठी कोंडी झाली आहे. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा सुरू असताना मराठी, इंग्रजी आणि विज्ञान विषयांच्या दिवशीच पटपडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

इयत्ता पहिली ते आठवीसाठीही ११, १५ आणि २२ एप्रिल या कालावधीत पडताळणी करण्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या काळातच संबंधित इयत्तांच्या परीक्षा देखील आयोजित करण्यात येत असल्याने शिक्षकांवर दुहेरी जबाबदारी येणार आहे.

इयत्ता नववीसाठी पूर्व-प्रगत चाचणी (पॅट) च्या दिवशीही पटपडताळणी करण्याचे आदेश आहेत. म्हणजेच, विद्यार्थ्यांच्या परीक्षांसोबतच उपस्थिती तपासण्याचे अतिरिक्त काम शिक्षकांना करावे लागणार आहे. शासनाने या प्रक्रियेसाठी स्वतंत्र पोर्टलवर मुख्याध्यापक, क्लस्टर हेड, बीईओ आणि शिक्षणाधिकारी यांना लॉगिनची सुविधा दिली असली, तरी प्रत्यक्षात शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवण्याची जबाबदारी शिक्षकांवरच टाकण्यात आली आहे.

पटपडताळणीची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी शिक्षण विभागासोबतच जिल्हा परिषदेच्या इतर विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची मदत घेण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.

## राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीतून ७ जणांची माघार; आज चित्र होणार स्पष्ट

● **राहुरी । वीरभूमी -** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीतून उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दुसऱ्या दिवशी चार उमेदवारांनी माघार घेतली आहे. यामुळे आता माघार घेणाऱ्या उमेदवारांची संख्या ७ झाली आहे. येथे भाजपाचे अक्षय कर्डिले व राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे गोविंद मोकाटे यांच्यात सरळसरळ लढत होण्याची चिन्हे आहेत. मात्र अद्याप शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे रावसाहेब खेवरे यांचा उमेदवारी अर्ज राहिल्याने ते माघार घेतात की नाही याकडे लक्ष लागून राहीले आहे.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेर दिवसा पर्यंत एकूण ३० जणांनी ४२ अर्ज दाखल केले होते. यातील ७ अर्ज छाननीमध्ये अवैध तर २३ अर्ज वैध ठरविण्यात आले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या पहिल्या दिवशी ३ व दुसऱ्या दिवशी ४ अशा एकुण ७ जणांनी माघार घेतली आहे. यामध्ये प्रतिमा किशोर देसर्डा, कोळसे बाळू बापूराव, बिलाल गफुरभाई शेख, सुदर्शन लक्ष्मण शितोळे, अल्ताफ इब्राहिम शेख, सखाहरी शांताराम बर्डे, इम्रान नबी देशमुख यांचा समावेश आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज दि. ९ रोजी अखेरचा दिवस असल्याने मोठ्या राजकिय घडामोडी होण्याचा अंदाज आहे. आज उमेदवारी अर्ज माघारीनंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. मतदानाची विभागणी टाळण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांकडून इतर उमेदवारांनी माघार घ्यावी यासाठी जोरदार प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, सात जणांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. गेल्या दोन दिवसांत राजकीय घडामोडींना वेग आला असून, आज दिवसभरात आणखी काही उमेदवार माघार घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# भविष्य सांगण्याच्या बहाण्याने वृद्धांना लुटणारी टोळी गजाआड

## अहिल्यानगर शहरात घडल्या दोन घटना । दोन आरोपींना कोतवाली पोलिसांकडून अटक

● **अहिल्यानगर । वीरभूमी -** वृद्ध नागरिकांना गाठून त्यांचे भविष्य सांगतो असे भासवून त्यांच्याकडून सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या दोन भामट्यांना कोतवाली पोलिसांनी मोठ्या शिताफीने जेरबंद केले आहे. पोलिसांनी या आरोपींकडून चोरीला गेलेल्या दोन सोन्याच्या अंगठ्या हस्तगत केल्या असून, या कारवाईमुळे शहर परिसरात पोलिसांचे कौतुक होत आहे

आरोपींनी शहरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांना आपले लक्ष केले होते:

पहिली घटना (केडगाव): फिर्यादी संतोष चंद्रसेन गायकवाड (वय ६८ वर्ष) हे २८ मार्च २०२६ रोजी केडगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर बसलेले असताना दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना गाठले. भविष्य सांगण्याच्या बहाण्याने त्यांचा विश्वास संपादन करून, हातातील सोन्याची अंगठी २० रुपयांच्या नोटेमध्ये गुंडाळून खिशात ठेवल्याचे भासवले आणि ती लंपास केली.

दुसरी घटना (सावेडी): फिर्यादी अरुण सहादु निंबाळकर (वय ७४ वर्ष) हे सावेडी येथील पुणे एसटी स्टँडवर बसची वाट पाहत असताना, त्यांनाही याच पद्धतीने भविष्य सांगण्याच्या बहाण्याने फसवून त्यांची सोन्याची अंगठी चोरली होती.

घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करून दोन अनोळखी इसमांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्हाची कबुली दिली असून त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या १,२०,०००/- रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या अंगठ्या (७ ग्रॅम आणि ५ ग्रॅम वजनाच्या) हस्तगत करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात बीएनएस २०२३ च्या कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टीपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पथकाने केली आहे.

कोतवालीचे पोनि. संभाजी गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक




प्रविण पाटील, म.पो.हे.कॉ. रोहिणी दरंदले, पोलीस हे.कॉ. राहुल शिंदे, पोलीस हे.कॉ. दौंड, दिपक रोहकले, सत्यम शिंदे, सुरज कदम, सचिन लोळगे, राम हंडाळ, सायबर क्राईमचे राहुल गुंडू यांच्या पथकाने ही कारवाई केली. या गुन्ह्याचा पुढील तपास म.पो.हे.कॉ. रोहिणी दरंदले या करत आहेत.

# SPOT NEWS

## आदर्श एकल महिलांना पुरस्कार ही जगदंब फाउंडेशनची उत्कृष्ट संकल्पना

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अनेक संकटावर मात करून ज्या एकल महिलांनी व्यवसाय सुरू करून स्वतःचे कुटुंब सावरले व प्रगती केली अशा एकल महिला शोधून त्यांना पुरस्कार देण्याची ही जगदंब फाउंडेशनची संकल्पना खूप उत्कृष्ट आहे, असे उद्गार महापौर ज्योती गाडे यांनी एकल महिलांच्या मेळावा प्रसंगी काढले. अहिल्यानगर महानगरपालिका, जगदंब फाउंडेशन व साऊ एकल महिला समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये नुकताच एकल महिलाचा भव्य असा रोजगार मेळावा पार पडला. यामध्ये कडधान्य वाटप, बॅग वाटप, एकल महिलांना पुरस्कार वितरण, पैठणी सह भव्य लकी ड्रॉ, रोजगार उद्योग विषयाबाबत चर्चासत्र व विविध शासकीय योजनांची माहिती असे विषय होते. महानगरपालिकेच्या महिला बालकल्याण सभापती दिपाली बारस्कर यांनी एकल महिलांसाठी महानगरपालिकेमार्फत चांगले मोठे प्रकल्प नक्कीच राबविले जातील असे आश्वासन फाउंडेशनला दिले. या महामेळाव्याचे चोख असे नियोजन फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे, कार्याध्यक्षा जयश्री कुटे, साऊ समितीचे जिल्हाध्यक्ष व फाउंडेशनचे सचिव अशोक कुटे, प्रकाश इथापे, दत्तात्रय उरमुडे, अश्विनी झरेकर, सुजाता गोरे, अश्विनी जाधव सावित्रा प्रशांत गायकवाड यांनी केले होते. माजी उपमहापौर गीतांजली काळे व माजी महिला बालकल्याण सभापती, विद्यमान नगरसेविका पुष्पाताई बोरुडे यांनी एकल महिलांचा असा मेळावा प्रथमतःच नगर महानगरपालिकेमध्ये घडत आहे असे म्हणून फाउंडेशनच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल त्यांचे कौतुक केले. सर्वांनी एकल महिलांचा सन्मान करावा असे त्यांनी आवाहन केले.

## माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने पै. नाना डोंगरे यांचा सन्मान

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते तथा सोसायटीचे सभासद पै. नाना डोंगरे यांचा सन्मान करण्यात आला. जळगाव येथे तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने 'पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार' मिळाल्याबद्दल हा उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते पै. डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, चेअरमन आप्पासाहेब शिंदे, व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, संचालक बाबासाहेब बोडखे, सुनील दानवे, महेंद्र हिंगे, सुरज घाटविसावे, वैशाली दारकुंडे, वर्षा खिलारी, राजेंद्र कोतकर, उमेश गुंजाळ, सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे यांच्यासह चंद्रकांत पवार, निळकंठ वाघमारे अनेक मान्यवर उपस्थित होते. सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, सांस्कृतिक आणि पर्यावरण संवर्धन या विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन पै. नाना डोंगरे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून त्यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात सातत्याने सामाजिक उपक्रम राबवले आहेत. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, अनेक युवकांना प्रेरणा देणारे कार्य उभारले असल्याचे उपस्थितांनी कौतुक केले.

# पाथर्डीतील ७९ ग्रामपंचायतींची प्रारूप प्रभागरचना जाहीर

### हरकतींसाठी १३ एप्रिलपर्यंत मुदत । ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रक्रिया वेगात

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील ७९ ग्रामपंचायतींसाठी प्रारूप प्रभागरचना सोमवारी (दि. ६ एप्रिल २०२६) जाहीर करण्यात आली आहे. संबंधित ग्रामपंचायतींच्या नोटीस बोर्डावर हा आराखडा प्रदर्शित करण्यात आला असून, त्यावर हरकती नोंदवण्यासाठी १३ एप्रिल २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींसाठी ग्रामविकास विभागाने प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार पाथर्डी तालुक्यातील ७९ ग्रामपंचायतींसाठी ही प्रक्रिया राबवण्यात येत आहे. प्रारूप प्रभागरचनेत प्रत्येक गावाची लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती, वस्ती विभागणी तसेच निवडणूक नियमांचा विचार करून प्रभागांची सीमा निश्चित करण्यात आली आहे.



या प्रक्रियेत तिनखडी, मालेवाडी, मुंगूसवाडे, कौडगाव, पिंपळगाव टप्पा, पिंपळगव्हाण, सोमठाणे नलावडे, सोमठाणे खुर्द, शिरापूर, येळी, वाळुंज, सुसरे, शिरसाठवाडी, शिराळ, शिंगवे केशव, शेकटे, सातवड, राघोहिवरे, पिरेवाडी, पत्र्याचा तांडा, पारेवाडी, पागोरी पिंपळगाव, निपाणी जळगाव, नांदूर निंबादैत्य, मोहोज खुर्द, मोहोजदेवढे, मोहोज बु., मोहटे, माणिकदौंडी, मढी, लोहसर, लांडकवाडी, कोपरे, खेर्डे, खरवंडी कासार, खांडगाव, करोडी, कारेगाव, कामत शिंगवे, कळसपिंप्री, कडगाव, जोगेवाडी, जवळवाडी, जवखेडे दुमाला, जाटदेवळे, जांभळी, हनुमान टाकळी, घाटशिरस, घुमटवाडी, धनगरवाडी, धामणगाव, ढाकणवाडी, देवराई, भुतेटाकळी, औरंगपूर, अकोला, चिंचपूर पांगूळ, चितळवाडी, भिलवडे, बोरसेवाडी, आल्हणवाडी, आडगाव, आगसखांड, एकनाथवाडी, तोंडोळी, रांजणी, मिडसांगवी, मिरी, माळीबाभुळगाव, मांडवे, भारजवाडी, कासार पिंपळगाव, चिंचपूर इजदे, चितळी, भोसे, सांगवी बु., केळवंडी, दुलेचांदगाव आणि कोकीसपीर तांडा या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

संबंधित ग्रामपंचायत स्तरावर प्रारूप प्रभाग रचना आराखडा उपलब्ध करून देण्यात आला आहे. ग्रामस्थ, राजकीय कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांनी हा आराखडा तपासून पाहावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

प्रभाग रचनेत काही त्रुटी किंवा हरकती असल्यास त्या १३ एप्रिल २०२६ पर्यंत लेखी स्वरूपात संबंधित तहसील कार्यालयात सादर करता येणार आहेत. प्राप्त हरकतींवर सुनावणी घेऊन अंतिम प्रभाग रचना जाहीर केली जाणार आहे.

ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, प्रभाग रचना अंतिम झाल्यानंतर निवडणूक आयोगाकडून निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे.

## २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर शिक्षक समन्वय समिती ठाम

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने राज्यातील सरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी येत्या मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ पासून बेमुदत संप आंदोलन छेडण्याचा निर्धार केला आहे. सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना तात्काळ लागू करावी तसेच विविध प्रलंबित मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी हा संप पुकारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर तालुकानिहाय दौरे सुरु करण्यात आले असून, हा संप यशस्वी करण्याचे आवाहन समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी केले आहे.

समन्वय समितीच्या म्हणण्यानुसार, राज्य शासनाने पूर्वीच्या आंदोलनांनंतर जुन्या पेन्शनसदृश आर्थिक व सामाजिक सुरक्षा देण्याचे धोरण तत्त्वतः मान्य केले होते. तसेच यासंदर्भात समिती स्थापन करून शिफारशीही स्वीकारण्यात आल्या. दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा शासन निर्णय झाला असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. परिणामी, १ मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळत नसल्याने मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

राज्यात सध्या एनपीएस, आरएनपीएस व केंद्राची यूपीएस योजना या पर्यायांचा विचार सुरू आहे. मात्र, एनपीएस योजना कर्मचाऱ्यांसाठी अपुरी असल्याचे मत, केंद्रातील यूपीएस योजना अनेक कर्मचाऱ्यांनी नाकारल्याचा उल्लेख, आरएनपीएस योजना अधिक सुरक्षित व फायदेशीर असल्याचा दावा आहे. आरएनपीएस अंतर्गत कर्मचाऱ्यांचे १०% व शासनाचे १४% (पुढे वाढून सुमारे १८.५%) योगदान जमा होऊन निवृत्तीनंतर शेवटच्या वेतनाच्या ५०% पर्यंत पेन्शन मिळण्याची हमी दिली जाते.

त्यामुळे ही योजना कर्मचाऱ्यांसाठी अधिक सुरक्षित मानली जात आहे. समितीने सांगितले की, गेल्या १५ महिन्यांत सात वेळा आंदोलन करूनही शासनाने ठोस निर्णय घेतलेला नाही. मुख्यमंत्री स्तरावर नियमित चर्चा यंत्रणा निर्माण करण्याची मागणीही करण्यात आली आहे, जेणेकरून लहान-मोठे प्रश्न तात्काळ सोडवता येतील.

## बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयात मोफत MH-CET क्रॅश कोर्सचा समारोप

### प्रामाणिक कष्टाने यश निश्चित : एकनाथ ढोले

**● पाथर्डी । वीरभूमी–**

शहरातील बाबूजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालय येथे विज्ञान शाखेच्या बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत MH-CET क्रॅश कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. पार्थ विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभयराव आव्हाड यांच्या संकल्पनेतून तसेच प्राचार्य डॉ. बबन चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली सलग दुसऱ्या वर्षी हा उपक्रम राबविण्यात आला.



या कोर्सच्या निरोप समारंभासाठी श्री स्वामी समर्थ बाल विद्या मंदिर चे मुख्याध्यापक एकनाथ ढोले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, आयुष्यात आई-वडील आणि शिक्षक यांच्याकडून मिळणारे मार्गदर्शन अमूल्य असते. शिक्षकांनी दिलेले ज्ञान ऐकून ते कृतीत उतरवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

प्रामाणिक कष्ट आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर विद्यार्थी MH-CET परीक्षेत यश मिळवू शकतात. परिस्थिती कधीही अडथळा ठरत नाही. दहावी, अकरावी आणि बारावी ही तीन वर्षे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारी असतात. वेळेचे महत्त्व ओळखणारे विद्यार्थीच आयुष्यात यशस्वी होतात, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःची व पालकांची स्वप्ने पूर्ण करण्याचे आवाहन केले.

महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या या मोफत सुविधेमुळे विशेषतः गरजू विद्यार्थ्यांना मोठा फायदा होत असून त्यांनी या संधीचा पूर्ण उपयोग करून घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले. प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबाबत मार्गदर्शन करून उएढ परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी साक्षी सांगळे, सानिका म्हस्के, आदित्य सानप, कृष्णा ठेंगल या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी म्हणून राधाकृष्ण रुपनर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. सलीमशेख यांनी केले. कार्यक्रमाला कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, MH-CET समन्वयक सुधीर सुडके तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रणिता भावसार यांनी केले, तर आश्विनी एडके यांनी आभार मानले.

# जनता विद्या मंदिरच्या १९८६-८७ बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात

### चार दशकांनंतर मित्र-मैत्रिणींची भेट । आठवणींना उजाळा देत भावनिक वातावरण

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी येथील जनता विद्या मंदिर शाळेच्या १९८६-८७ शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नगर रोडवरील बाभूळगाव येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात शनिवारी उत्साहात पार पडला. सुमारे ४० वर्षांनंतर सर्व मित्र-मैत्रिणी एकत्र आल्याने कार्यक्रमाला भावनिक व आनंदमय रंग चढला.

हा स्नेहमेळावा तिसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आला होता. यापूर्वीही दोन वेळा अशा प्रकारचे स्नेहसंमेलन झाले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सदाशिव खेडकर यांनी प्रास्ताविकातून स्नेहमेळाव्याचा उद्देश स्पष्ट केला, तर सूत्रसंचालन ग्रुपचे डमिन सुखदेव शिंदे यांनी केले.

यावेळी उपस्थितांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. कोण हुशार, कोण खोडकर, तर कोणाचा टापटीपपणा अशा आठवणींनी सभागृहात हास्यकल्लोळ उसळला. अनेक वर्षांनंतर भेट झाल्याने सर्वांनी एकमेकांच्या जीवनप्रवासाची माहिती घेत जुन्या आठवणी ताज्या केल्या.

या प्रसंगी शिक्षकी पेशातून निवृत्त झालेले सुखदेव शिंदे आणि मिनीनाथ झाडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच योगा स्पर्धेत राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल सदाशिव खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतलेल्या रामदेव बाबांच्या शिष्याचाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात ग्रुपचे सदस्य कारभारी खेडकर यांनी बदलत्या काळात समाजासाठी व पुढील पिढीसाठी काय करणे आवश्यक आहे याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या पाल्यांच्या यशोगाथा सांगितल्या व यशस्वी विद्यार्थ्यांच्या पालकांचाही सत्कार करण्यात आला.

महिला सदस्यांमध्ये सौ. अलका आघाव, ज्योती चातुर, शारदा दळवी, अनुराधा भागवत यांच्यासह इतर मैत्रिणींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुखदेव शिंदे, किशोर पारखे, मिनीनाथ झाडे, सदाशिव खेडकर, देविदास पारखे, बाळासाहेब वामन, जनार्धन बोडखे, विजय भगत, आदिनाथ शेळके, गोरख खाडे आदींनी विशेष परिश्रम घेतले. सर्व



सदस्यांनी सपत्नीक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाच्या शेवटी बाळासाहेब वामन आणि सुखदेव शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. जुन्या आठवणींना उजाळा देत मैत्रीचे बंध अधिक दृढ करणारा हा स्नेहमेळावा सर्वांच्या स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## नागरदेवळेत शुक्रवारी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी, १० एप्रिल रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात पार पडणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी केले आहे. या शिबिरामध्ये तज्ज्ञ नेत्ररोग डॉक्टरांकडून अद्ययावत यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. यासोबतच जेष्ठ नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या देखील मोफत करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना एकाच ठिकाणी सर्वसमावेशक आरोग्य सेवा मिळणार आहे. नेत्र तपासणीनंतर ज्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासेल, अशा रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यामध्ये मोतीबिंदू, काचबिंदू तसेच लहान मुलांच्या तिरळेपणावरील शस्त्रक्रियांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे, या शस्त्रक्रियेसाठी रुग्णांचे पुणे येथे येणे-जाणे, राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. या शिबिरासाठी नाव नोंदणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी जालिंदर बोरुडे यांचेशी संपर्क साधावा, असे फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## खांब उभे पण दिवे गायब! महावीर नगरमध्ये अंधारामुळे नागरिक त्रस्त

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
शहरातील महावीर नगर परिसरात पथदिव्यांचे खांब उभारण्याचे काम काही महिन्यांपूर्वी पूर्ण झाले असले, तरी अद्याप त्या खांबांवर दिवे बसवण्यात आलेले नाहीत. परिणामी संपूर्ण परिसर रात्रीच्या वेळी अंधाराच्या विळख्यात सापडत असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महावीर नगरमध्ये मुख्य रस्त्यांसह अंतर्गत गल्ल्यांमध्येही अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. रात्रीच्या वेळी पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच वाहनचालकांना सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः शाळा-कॉलेजमधून घरी परतणाऱ्या विद्यार्थ्यांना अंधारामुळे धोका वाढला असून अपघात किंवा अन्य अनुचित प्रकार घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिकांच्या मते, पथदिव्यांचे खांब उभारल्यानंतर प्रशासनाकडून काम पूर्णत्वास नेण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. खांब उभे करून काम पूर्ण झाले असे दाखवले जात आहे, मात्र प्रत्यक्षात दिवे नसल्यामुळे त्याचा काहीही उपयोग होत नाही, अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली. या संदर्भात समाजसेवक अविनाश देडगावकर यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले असून, संबंधित विभागाने तातडीने पथदिवे बसवून ते सुरू करावेत, अशी मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, महावीर नगरसारख्या वाढत्या वस्तीच्या भागात मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. नागरिकांच्या सुरक्षेसाठी पथदिवे त्वरित कार्यान्वित करणे अत्यावश्यक आहे.

# शेवगावमध्ये महिलांना चाकूचा धाक दाखवत लुटीचे प्रयत्न

### गस्त वाढवून कडक कारवाईसाठी नागरिकांचे पोलिसांना निवेदन

**● शेवगाव । वीरभूमी–**
शहरातील महिलांना लक्ष्य करून चाकूचा धाक दाखवत सोन्याचे दागिने लुटण्याच्या प्रयत्नांच्या घटना वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर जागरूक नागरिकांनी शेवगाव पोलिस स्टेशन येथे निवेदन देत तातडीने कारवाई करत चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.




गेल्या काही दिवसांपासून भर बाजारपेठ, खंडोबानगर, शिवाजी चौक, ब्राह्मण गल्ली तसेच श्रीराम कॉलनी परिसरात रात्रीच्या वेळी काही अज्ञात व्यक्ती महिलांना धमकावत दागिने हिसकावण्याचा प्रयत्न करत असल्याच्या घटना घडल्या आहेत. काही घटनांमध्ये आरोपींनी चाकूचा धाक दाखवून महिलांचा पाठलाग केल्याचाही उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. अशा घटनामुळे परिसरातील महिला, विद्यार्थी व नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहराच्या मध्यवर्ती भागात अशा घटना घडत असताना पोलिसांनी अधिक सतर्कतेने गस्त घालणे आवश्यक आहे. महिलांची सुरक्षितता हा अत्यंत संवेदनशील मुद्दा असून भविष्यात गंभीर घटना टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. यामुळे संबंधित परिसरात दिवस-रात्र पोलिस गस्त वाढवावी. संशयितांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी. शहरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींची ओळख पटवावी. महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष पथक नियुक्त करावे, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

या घटनांमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था स्थितीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पोलिसांकडून तातडीची व प्रभावी कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. महिलांची सुरक्षितता धोक्यात येत असल्याने भविष्यातील घटना रोखण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलणे आवश्यक आहे, असे नागरिकांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पोलिसांनी निवेदनाची दखल घेत संबंधित परिसरात अतिरिक्त गस्त वाढविण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी डॉ. नीरज लांडे, दत्तात्रय फुंदे, उज्वल धूत, हरीश शिंदे, सागर शिनगारे, रेशम शेळके, विजय काथवटे आदी उपस्थित होते.

## ई-पीक पाहणी नोंदणी २४ मेपूर्वी करा : जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन



**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
उन्हाळी हंगाम २०२५-२०२६ साठी राज्यात ई-पीक पाहणी मोबाईल पद्वारे पीक नोंदणी प्रक्रियेला सुरुवात झाली असून, सर्व शेतकऱ्यांनी २४ मे २०२६ पूर्वी आपल्या पिकांची अचूक नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

पिकांची नोंदणी न केल्यास सातबारा उताऱ्यावर पीक नोंद रिक्त राहण्याची शक्यता असून, ती नंतर भरता येणार नाही. त्यामुळे अवकाळी पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मिळणारी मदत, पीक विमा तसेच विविध शासकीय अनुदान मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शासनाच्या निर्णयानुसार ई-पीक पाहणी प्रक्रिया दोन टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात शेतकरी स्तरावर ८ एप्रिल ते २४ मे २०२६ या कालावधीत नोंदणी केली जाईल, तर दुसऱ्या टप्प्यात २५ मे ते ८ जुलै २०२६ या कालावधीत सहाय्यक स्तरावर पडताळणी केली जाणार आहे.

उन्हाळी हंगामात शेतात उभे असलेले पीक, कायम पड तसेच सध्या पडीत असलेल्या जमिनींची नोंद करणे बंधनकारक असल्याचेही प्रशासनाने सांगितले आहे. या प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व तहसीलदारांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

भविष्यातील संभाव्य नुकसान टाळण्यासाठी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी निर्धारित कालावधीत मोबाईल पद्वारे पीक नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

## पाथर्डीत काँग्रेसच्या 'संघटन सृजन अभियानाला' प्रारंभ

### सरत राऊत यांची उपस्थिती । ग्राम व बूथस्तरावर संघटन बळकट करण्याचा निर्धार



**● पाथर्डी । वीरभूमी–**
अखिल भारतीय काँग्रेस कमिटी यांच्या आदेशानुसार काँग्रेस पक्षाच्या 'संघटन सृजन अभियानांतर्गत' पाथर्डी येथे पक्ष बळकटीकरण मोहिमेचा प्रारंभ ५ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आला. हा कार्यक्रम ओरिसाचे माजी मंत्री सरत राऊत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी अभियानाचे जिल्हा समन्वयक किरण पाटील, काँग्रेस जिल्हा सचिव ज्ञानदेव वाफारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना सरत राऊत यांनी काँग्रेस पक्षाची स्वातंत्र्यलढ्यातील तसेच देशाच्या जडणघडणीत असलेली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रामाणिक कार्यकर्त्यांना संधी देऊन पक्षाला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न या मोहिमेतून होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

पाथर्डी तालुका काँग्रेस अध्यक्ष नासिर शहनवाज शेख यांनी सांगितले की, या अभियानामुळे पक्षाचे संघटन ग्रामस्तर व बूथस्तरावर अधिक सक्षम होईल. आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेसला गतवैभव प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष जालींदर काटे, पोपट बडे, सुनील दौंड, नवाब शेख, रोहिदास खेडकर, जुनेद पठाण, शुभम गर्जे, प्रशांत मगर, सुभाष कोलते, संपतराव क्षेत्रे, अक्षय फुंदे, ज्ञानदेव खेडकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकोलेत 'शिव-फुले-शाहू-आंबेडकर' व्याख्यानमालेचे आयोजन

### ११ ते १४ एप्रिलदरम्यान मान्यवरांचे मार्गदर्शन । डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महानाट्याचे सादरीकरण

**● अकोले । वीरभूमी–**
अकोले येथे ११ ते १४ एप्रिल दरम्यान मान्यवर व्याख्यात्यांच्या उपस्थितीत 'शिव-फुले-शाहू-आंबेडकर' व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेची सुरुवात ज्येष्ठ पत्रकार व रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते पी. साईनाथ यांच्या व्याख्यानाने होणार असून ते 'शेती आणि शेतकऱ्यांसमोरील आव्हाने' या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत. 'दुष्काळ आवडे सर्वांना' या त्यांच्या गाजलेल्या पुस्तकातून त्यांनी शेती, शेतकरी, दुष्काळ, गरिबी, शेतकरी आत्महत्या व बेरोजगारी यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. ११ एप्रिल रोजी होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. बबनराव महाले तर स्वागताध्यक्ष प्रा. बाळासाहेब मेहेत्रे असतील.







१२ एप्रिल रोजी नव्या पिढीतील प्रभावी कवी डॉ. स्वप्नील चौधरी 'चल दंगल समजून घेऊ' या विषयावर कवितांचा कार्यक्रम सादर करणार आहेत. निसर्ग व समाज विषयांवरील संवेदनशील अभिव्यक्तीमुळे ओळख असलेल्या डॉ. चौधरी यांचे सादरीकरण विशेष ठरणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. विवेक महाराज केदार असून अकोले तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सखाराम घनकुटे स्वागताध्यक्ष असतील.

व्याख्यानमालेच्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. शामसुंदर सोन्नर महाराज 'समतेची शिकवण देणारा वारकरी संप्रदाय आणि आजचा महाराष्ट्र' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. वारकरी संप्रदायातील प्रभावी कीर्तन-प्रवचनांद्वारे समाजप्रबोधन करणारे सोन्नर महाराज संविधान समता दिंडीचे संचालक असून सर्वधर्मसमभाव, बंधुता, समता आणि मानवता या मूल्यांविषयी जनजागृती करतात. या सत्राच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. संपत महाराज भोर तर स्वागताध्यक्ष ह.भ.प. डॉ. भाऊराव महाराज उघडे असतील.

१४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'संघम् शरणम् गच्छामी' हे त्यांच्या जीवन व कार्यावर आधारित महानाट्य सादर करण्यात येणार आहे. हैदराबाद येथील अभ्युदय कला अकादमीचा २१ कलाकारांचा संच हे नाट्य सादर करणार असून या महानाट्याचे देशभरात ८०० हून अधिक प्रयोग झाले आहेत. या नाट्यात प्रसिद्ध अभिनेते जग्गाराजू यांनी डॉ. आंबेडकर यांची भूमिका साकारली आहे.

महानाट्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त छोटेखानी अभिवादन सभा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजयराव वाकचौरे असतील, तर आयाज शेख स्वागताध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळतील. आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

अकोले तालुक्याला पुरोगामी विचार, आचार आणि नेतृत्वाचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. सुमारे तीन दशकांपासून सुरू असलेली 'शिव-फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमाला' ही अकोलेच्या भूमीत वैचारिक व सांस्कृतिक अभिसरण घडवणारा अत्यंत प्रभावी आणि महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला आहे. या व्याख्यानमालेत डॉ. नरेंद्र दाभोळकर, मेधा पाटकर, राजू शेट्टी, हुसेन दलवाई, विश्वास नांगरे पाटील यांसह अनेक मान्यवरांनी व्याख्याने देऊन परंपरेला वैचारिक उंची प्राप्त करून दिली आहे.

अकोले तालुक्यातील नागरिकांनी या सर्व कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून 'शिव-फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमाला' यशस्वी करण्यासाठी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

या व्याख्यानमालेच्या यशस्वितेसाठी संयुक्त जयंती महोत्सव समिती, बळीराजा अभ्यास मंडळ, छात्रभारती, राष्ट्र सेवा दल, समता परिषद, इब्टा, साथी अमृतभाई मेहता प्रतिष्ठान, व्यापारी असोसिएशन, केमिस्ट-ड्रगिस्ट असोसिएशन, शिक्षक संघटना, प्राध्यापक संघटना तसेच विविध समविचारी संस्था प्रयत्नशील आहेत.

व्याख्यानमालेच्या ठिकाणी पुस्तक प्रदर्शन व विक्रीसाठी स्टॉल लावण्यात येणार आहे. तसेच व्याख्यान सुरू होण्यापूर्वी अकोले तालुक्यातील गायक समतेची गाणी सादर करणार आहेत.

# विद्यार्थ्यांनी एकलव्याप्रमाणे ध्येयासाठी परिश्रम घ्यावेत

## जगद्गुरु कुंथुसागरजी महाराज | पाथर्डीत एम. एम. निऱ्हाळी विद्यालयात संतांचे आगमन

**● पाथर्डी | वीरभूमी–**
विद्यार्थी दशा ही जीवनाच्या कल्याणासाठी मुख्य आधारस्तंभ असून शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी एकलव्याप्रमाणे केवळ आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी परिश्रम घ्यावेत. व्यसने, मोबाईल व सुखासीन जीवनाचा त्याग करून शिक्षणावर लक्ष केंद्रित केल्यास आत्मकल्याणासोबत राष्ट्रकल्याणही साध्य होऊ शकते, असे प्रतिपादन जैन दिगंबर पंथाचे जगद्गुरु कुंथुसागरजी महाराज यांनी केले.

येथील एकलव्य शिक्षण संस्थेच्या एम. एम. निऱ्हाळी विद्यालयात पैठणवरून कोल्हापूरकडे प्रवासादरम्यान महाराज व त्यांच्या पाच शिष्यांचे काही काळ विश्रांतीसाठी आगमन झाले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी पुष्पवृष्टी करत संतांचे स्वागत केले. प्रारंभी नग्नावस्थेतील दिगंबर साधूंना पाहून विद्यार्थी काही क्षण चकित झाले; मात्र त्यांच्या साधना, तपश्चर्या व जीवनपद्धती समजून घेतल्यानंतर ते भावूक झाले.

महाराजांचा प्रवास पैठण–पाथर्डी–करमाळा–बारामती मार्गे कोल्हापूर येथे असून २६ तारखेच्या सुमारास ते मुख्य मंदिरात पोहोचणार आहेत. २१ नोव्हेंबरपासून त्यांचा दौरा सुरू आहे. दौऱ्याचे व्यवस्थापक कलबुर्गीचे साधक अजित कासार यांनी आगाऊ संपर्क साधून कार्यक्रमाचे नियोजन केले. संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रताप ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ व्यवस्था करण्यात आली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचा लाभ देण्यात आला.

यावेळी बोलताना महाराज म्हणाले, जीवनातील खरे सुख भोगात नसून त्यागात आहे. सर्व धर्म आत्मकल्याणाची शिकवण देतात; भोगवाद नव्हे. येणारा काळ प्राणीमात्रांसाठी आव्हानात्मक असून त्यागी, साधनाशील व ईश्वरभक्त जीवन जगणाऱ्यांनाच टिकून राहता येईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत सर्व जीवांच्या कल्याणासाठी प्रार्थना करावी.

ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी सर्व प्राणीमात्रांचे रक्षण व्हावे अशा व्यापक हेतूने प्रार्थना करताना अभ्यासावर सुद्धा लक्ष केंद्रित करावे. शिकण्यासाठी जे काही मिळते, तो सर्व अभ्यासच असतो. त्यामुळे विद्यार्थी दशा ही आयुष्याच्या अंतापर्यंत संपत नाही. आई–वडिलांचा त्याग आठवा,गुरुजनांची तळमळ आठवा, कुटुंबीयांची भावना ओळखा व जीवनाचा मार्ग निश्चित करा. शुद्ध सात्विक, आहार, व शुद्ध दिनचर्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व मानसिक विकासासाठी आवश्यक आहे. शाकाहार हाच फक्त मानवी आहार असून त्यासाठी विद्यार्थ्याने कुटुंबामध्ये आग्रही राहावे. आदर्श शोधण्यात वेळ घालवू नका, स्वतः आदर्श बना, असेही ते म्हणाले.



दैनंदिन जीवनात किमान एक तरी परोपकाराचे कार्य करावे, ज्यामुळे आपल्याला सायंकाळची झोप निवांतपणे घेता येईल. सत्कर्म करताना संपूर्ण जग आपल्याला बघत असते, वाईट कर्म करताना मात्र आपणच आपल्या कर्माचे साक्षीदार असतो. त्यामुळे त्याची फेड सुद्धा फक्त आपल्यालाच करावी लागते. शाळेमधले गुरुजन हे केवळ आपल्याला पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर जीवन आत्मविश्वास पूर्ण व सन्मार्गाने जगण्याची शिकवण देतात. मात्र आपण त्याकडे फारसे गांभीर्याने बघत नाहीत. वाचन, चिंतन, मनन विद्यार्थ्यांसाठी खूपच आवश्यक आहे. निसर्गाशी एकरूप व्हा. पाण्याची बचत करा. अन्नधान्याची नासाडी करू नका. पशु पक्षांना अन्न पाणी द्या. येणाऱ्या जगाला आदर्श मुलांची गरज आहे ते घडविण्यासाठी अशा शाळा कारणीभूत ठरतील. या संस्थेच्या संस्थाचालकांचा इतिहास बघितला तर त्याग व परोपकाराच्या भावनेने भरलेला आहे. त्यामुळेच या परिसरामध्ये सुद्धा वेगळी चैतन्यशक्ती अनुभवायला मिळते. पाथर्डी तालुका संतांची भूमी आहे. ती येणाऱ्या काळात आदर्श विद्यार्थ्यांची भूमी ओळखली जावी यासाठी सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी आशीर्वाद दिले.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय घिगे, विश्वस्त श्रीकांत निराळी, पाथर्डी शहरातील लांबदाडे परिवार, अन्नदाते परिवार, घोडके सर, कांबळे परिवार, मोहेकर परिवार, भोसे परिवार आदी जैन बांधव उपस्थित होते. कलाशिक्षक गणेश सरोदे, सुरेखा वाघमोडे, अपर्णा शेळगावकर यांनी आकर्षक रांगोळ्या साकारल्या. ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब घुले यांनी आभार मानले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधानातून सामाजिक क्रांती घडवणारे महान विचारवंत

## प्रा. गणेश शेळके | शेवगाव येथे विशेष व्याख्यान

**● शेवगाव | वीरभूमी –**
भारतीय राज्यघटना अभेद्य असून समाजातील सर्व स्तरातील नागरिकांना न्याय देणारी आहे. भारतीय राज्यघटनेने दिलेला मतदानाचा हक्क सर्वोच्च असून इतर देशांप्रमाणे तो मिळवण्यासाठी भारतीयांना संघर्ष करावा लागला नाही. त्यामुळे मतदानाच्या हक्काचा योग्य वापर करून संविधान अधिक मजबूत करण्याचे आवाहन प्रा. गणेश शेळके यांनी केले.



ते न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शेवगाव येथील सामाजिक शास्त्र मंडळाच्या वतीने आयोजित विशेष व्याख्यानात बोलत होते. या व्याख्यानासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. गणेश शेळके उपस्थित होते. त्यांनी ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान’ या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून सामाजिक क्रांती घडवून आणली, असे प्रतिपादन प्रा. शेळके यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास विभागाचे डॉ. गहिनीनाथ शेळके होते. त्यांनी अध्यक्षीय मनोगतातून विषयाची मांडणी केली. कार्यक्रमाचे संयोजन सामाजिक शास्त्र मंडळाचे समन्वयक डॉ. सोपान नवथर तसेच सहसमन्वयक प्रा. कृष्णा रुईकर यांनी केले.

याप्रसंगी प्रा. राम कोरडे, प्रा. नारायण गोरे, प्रा. मिनाक्षी चक्रे आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे व उपप्राचार्य डॉ. युवराज सुडके यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

# अकोलेत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा १० एप्रिलपासून बेमुदत कामबंद व धरणे आंदोलनाचा इशारा

## वेतन व प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष | प्रशासनाविरोधात आंदोलनाचा निर्णय

**● अकोले | वीरभूमी –**
ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन जमा झालेले असतानाही अकोले पंचायत समिती प्रशासनाकडून ते कर्मचाऱ्यांना देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन, शाखा अकोलेच्या सदस्यांनी १० एप्रिल २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. तसेच अकोले पंचायत समितीसमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती युनियनचे तालुकाध्यक्ष संदिप घोडके व सचिव संतोष नाईकवाडी यांनी दिली.

युनियनच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, प्रशासनाला वेळोवेळी निवेदने देण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठका देखील घेण्यात आल्या. मात्र अद्याप कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

या मागण्यांमध्ये भविष्य निर्वाह निधीचे खाते अद्ययावत करणे, किमान वेतनानुसार वेतन अदा करणे, सुधारित दराप्रमाणे राहणीमान भत्ता देणे, सेवा पुस्तके अद्ययावत करणे तसेच कर वसुलीची अट रद्द झाल्यानंतर कर्मचाऱ्यांना देय असलेले ५० ते ७५ टक्के वेतन भविष्य निर्वाह निधीत दरमहा जमा करणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

कर्मचाऱ्यांच्या या मागण्यांबाबत जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाने पत्र क्र. १०५/२०२६, दि. २७ मार्च २०२६ रोजी गटविकास अधिकाऱ्यांना विविध प्रलंबित कामकाजाबाबत आदेश जारी केलेले आहेत. तरीदेखील गटविकास अधिकाऱ्यांकडून यावर कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यामुळे अखेर कामबंद व धरणे आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात येणार असल्याचे युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या आंदोलनाबाबतचे निवेदन गटविकास अधिकारी, अकोले यांच्यासह उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अहमदनगर, युनियनचे जिल्हाध्यक्ष तसेच पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले आहे.

या निवेदनावर युनियनचे तालुकाध्यक्ष संदिप घोडके, सचिव संतोष नाईकवाडी, उपाध्यक्ष तुकाराम कडाळी, कार्याध्यक्ष संतोष कोटकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तसेच या आंदोलनात कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पांडुरंग चासकर, गणेश माताडे, उत्तम शेटे, सुयोग कर्पे आदींनी केले आहे.

# रयतच्या शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेले संस्कार केंद्र

## मनोहर करांडे | लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण

**● अहिल्यानगर | वीरभूमी –**
रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत सांस्कृतिक, शैक्षणिक, कला व क्रीडा स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. वर्षभर विविध उपक्रमांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

शाळेमध्ये वर्षभर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वक्तृत्व, निबंध लेखन, चित्रकला, कथाकथन, हस्ताक्षर स्पर्धा तसेच विविध क्रीडा प्रकार व शैक्षणिक स्पर्धा परीक्षांचा समावेश होता. या सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ पारितोषिके मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.



हा बक्षीस वितरण सोहळा रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर सदस्य तथा माजी उपप्राचार्य मनोहर करांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनोहर करांडे यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेला एक संस्कार केंद्र आहे. आज या मंचावर उभे असलेले विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांच्यातील कौशल्य ओळखून त्याला योग्य दिशा देणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. रयत शिक्षण संस्थेची परंपरा ही ‘शिका आणि समाज घडवा’ या तत्वावर आधारित आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा वारसा या शाळेत जपला जात आहे. पालकांनीही मुलांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या गुणवत्तेला वाव द्यावा. शिक्षणाबरोबरच संस्कार आणि क्रीडा यांचेही महत्त्व लक्षात घेण्याचे त्यांनी आवाहन केले.

ज्ञानदेव पांडुळे म्हणाले की, शाळेत वर्षभर विविध स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्याचा प्रयत्न असतो. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासातच नव्हे तर कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही प्रगती केली पाहिजे, या उद्देशाने आम्ही सातत्याने उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# माजी महापौर अभिषेक कळमकरविरुद्ध आणखी एक अत्याचाराचा गुन्हा

**● अहिल्यानगर | वीरभूमी –**
अहिल्यानगरचे माजी महापौर तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर याच्याविरुद्ध महिलेवर अत्याचार केल्याचा आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. फकीरवाडा परिसरातील एका तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या तरुणीने म्हटले आहे की, लोकसभा निवडणुकीच्या प्रचार काळात आपली कळमकर यांच्या सोबत ओळख झाली. त्यानंतर त्याने आपल्याला नोकरीचे आमिष दाखविले त्यासाठी भिंगार कॅम्प परिसरातील नगर क्लब जवळ बोलाविले. तेथे पाण्यातून गुंगीचे औषध देऊन अत्याचार केला. त्याचे व्हिडीओ तयार केले. हा प्रकार कोणाला सांगू नको, अन्यथा व्हिडीओ व्हायरल करील अशी धमकी दिली. मी जेव्हा बोलाविल, जेव्हा बोलाविल तेव्हा यायचे, असेही आरोपीने धमकावल्याचे फिर्यादित म्हटले आहे.

कळमकर याच्याविरुद्ध या पूर्वीही एका महिलेवर अत्याचार केल्याचा गुन्हा तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल आहे. तिलाही शाळेत नोकरी देण्याचे आमिष दाखवून अत्याचार केल्याचा आरोप आहे.

या गुन्ह्यात कळमकर याचा अटकपूर्व जामीन फेटाळण्यात आला आहे. सध्या तो फरार आहे. न्यायालयाने त्याच्याविरुद्ध स्टँडिंग अटक वॉरंट काढले आहे. मात्र पोलिसांना तो अद्याप सापडला नाही. त्यामुळे पोलिसांना तो सापडत नाही की त्यांच्यावर कोणाचा दबाब आहे, अशी शंका व्यक्त होऊ लागली आहे.

कळमकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून नगर शहरातून विधानसभा निवडणूक लढविली होती. आमदार संग्राम जगताप यांनी त्यांचा पराभव केला होता. कळमकर यांच्याकडे पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष पद आहे. त्यांच्याविरुद्ध आता अत्याचाराचे दोन गुन्हे दाखल झाले आहेत.